| | |
|---|---|
| MHAU060006962025 | दिवाणी किरकोळ अर्ज/२१३/२०२५<br>सखाराम रामराव मनगटे वि.. महाराष्ट्र शासन |

**निशाणी १ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी 'वारसा दाखला' मिळणेकरिता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ अन्वये दाखल केला आहे. अर्जदार व त्यांचे वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

**अर्जदार यांच्या अर्जाचा सारांश पुढीलप्रमाणे**

२. कै.पार्वताबाई रामराव मनगटे ही दिनांक २७/०८/२०२४ रोजी वडोद, ता.कन्नड जि. छ. संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत. मयत व्यक्तीचे अर्जदार क्र.१ ते ५ हे अपत्य या नात्याने वारस आहेत.

३. कै.पार्वताबाई रामराव मनगटे यांना खालीलप्रमाणे कायदेशीर वारस आहेत.

| अ.क्र. | वारसांची नावे | वय | राहणेचे ठिकाण | मयताशी असलेले नाते |
|---|---|---|---|---|
| १. | सखाराम रामराव मनगटे | ७५ | वडोद, ता.कन्नड | मुलगा |
| २. | मुरलीधर रामराव मनगटे | ७२ | -//- | मुलगा |
| ३. | सुरेश रामराव मनगटे | ५२ | -//- | मुलगा |
| ४. | दिलीप रामराव मनगटे | ५२ | -//- | मुलगा |
| ५. | विष्णु रामराव मनगटे | ५५ | -//- | मुलगा |

४. कै.पार्वताबाई रामराव मनगटे यांना वरील वारसांशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत असे त्यांनी कथन केले आहे. कै.पार्वताबाई रामराव मनगटे हिचे पती नामे रामराव सखाराम मनगटे हे दिनांक ०५/०८/२०१२ रोजी मयत झालेले आहे. अर्जदार क्र.१ ते ५ यांना शासकिय व निमशासकीय कामे करण्यासाठी ग्रामपंचायत, तहसिल, तलाठी, नगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय इत्यादी येथे आवश्यक त्या कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे, सदर वारस प्रमाणपत्राची नोंद होणे गरजेचे आहे.

५. सदर अर्ज दाखल झाल्यानंतर न्यायालयाने स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला. सदरच्या आदेशान्वये स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला.

६. अर्जदारांच्या कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे दाद मागण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी... |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर... |

७. अभिलेखावरील कागदपत्रांची पडताळणी केली असता असे दिसून येते की, अर्जदार यांनी अर्जाच्या पुष्ट्यर्थ पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. सदर पुराव्याला विहीत मुदतीत कोणीही हरकत/आक्षेप नोंदवलेला नाही. याशिवाय अर्जदार यांनी कै.पार्वताबाई रामराव मनगटे यांच्या मृत्यूचा दाखला दाखल केला आहे, तसेच 'दैनिक शिवनातीर' या वर्तमान पत्रामधील जाहीर नोटिस दाखल केली आहे.

८. अभिलेखावरील कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की,

कै.पार्वताबाई रामराव मनगटे हिचा मृत्यू दिनांक २७/०८/२०२४ रोजी झाला होता. दिनांक १८/०४/२०२५ रोजी 'दैनिक शिवनातीर' या वर्तमानपत्रातून प्रसिध्द केलेली जाहीर नोटीस तसेच अर्जाच्या पुष्ट्यर्थ पुराव्याचे शपथपत्र दाखल आहे. अर्जदार यांनी दिलेल्या पुराव्याचे शपथपत्र तसेच जाहीर नोटीशीस कोणत्याही व्यक्तीने विहीत मुदतीत आक्षेप वा हरकत घेतलेली नाही. त्यामुळे, अर्जदार व जाबदार हेच कै.पार्वताबाई रामराव मनगटेम यांचे वारस आहेत. वरील सर्व पुराव्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, अर्जदार यांनी दाखल केलेला कागदोपत्री पुरावा हा निर्विवाद आहे. वारसा प्रमाणपत्राने कोणत्याही व्यक्तीचा हक्क निर्माण होत नाही किंवा नाश होत नाही. वारसा प्रमाणपत्राने औपचारिकरित्या मयत व्यक्तीस कोण वारस आहेत हे जाहीर केले जाते. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देवून मुद्दा क्र.२ बाबत मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. कै.पार्वताबाई रामराव मनगटे यांचे अर्जदार क्र.१ सखाराम रामराव मनगटे, अर्जदार क्र.२ मुरलीधर रामराव मनगटे, अर्जदार क्र.३ सुरेश रामराव मनगटे, अर्जदार क्र.४ दिलीप रामराव मनगटे, अर्जदार क्र.५ विष्णु रामराव मनगटे हे अपत्य या नात्याने वारस आहेत.

३. अर्जदारांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र अदा करण्यात यावे.

(खुल्या न्यायालयात जाहीर)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2026.03.23 16:26:17 +0530

कन्नड (वि. द. पाटील)

दिनांक : २३/०३/२०२६ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

कन्नड

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Vishnu D. Khambat, (Grade-III) |
| Court | V. D. Patil, Civil Judge Jr. Dn., &<br>J.M.F.C., Court No.1, Kannad |
| Date | 23/03/2026 |
| Order signed by the Presiding Officer | 23/03/2026 |
| Order uploaded on | 23/03/2026 |